प्रति,

मा.जनसंपर्क अधिकारी सो,

पुणे शहर (प्रेस रुम)

यांना सविनय सादर

रिपोर्ट :- व्ही.के.झंजाड, पोलीस उप-निरीक्षक, हडपसर पोलीस स्टेशन पुणे

यांजकडून विनंतीपूर्वक की,

विषय :- बेवारस मयत पुरुषाचे नातेवाईकाचा तपास होणेकामी सर्व वर्तमान पत्रात प्रसिध्दी होणेबाबत.

२/- हडपसर पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजि. नं. १४/२०१८ सीआरपीसी १७४ मधील एक अनोळखी इसम नाव पत्ता माहित नाही वय अंदाजे ४५ वर्षे, हा दि. १५/०१/२०१८ रोजी ०१/०० वाजता साडेसतरानळी रेल्वे गेटजवळ हडपसर पुणे येथे बेशुध्द अवस्थेत पडला आहे असे कंट्रोलरुम पुणे शहर यांना आरपीएफ चे पो कॉ. संतोष वायदंडे यांनी कळविलेने सदर इसमास ॲम्बुलन्सने ससुन हॉस्पीटल येथे नेले असता तो दि. १५/०१/२०१८ रोजी सकाळी ०५/२० वा ससुन हॉस्पीटल येथे डॉक्टरांनी तपासणीपुर्वी मयत घोषीत केले आहे. त्याचा एमएलसी नं. १०५१/२०१८ व त्याचे एमएलपीएम नं. २५९/२०१८ अन्वये पोस्ट मॉर्टेम झाले आहे. त्याचे वर्णन खालीलप्रमाणे.

नाव :- एक अनोळखी इसम वय अंदाजे ४५ वर्षे, उंची अंदाजे ५ फुट ५ इंच
रंगाने - सावळा, नेसणीस सॅण्डो बनीयान पांढरे व काळाशर्ट काळीपॅण्ट,
दाढी वाढलेली, डावे हातात स्टीलचे कडे व डावे हाताचे पोटरीवर A.K.
असे गोंदलेले.

तरी बेवारस मयत पुरुषाचे नातेवाईकाचा तपास होणेकामी सर्व वर्तमान पत्रात प्रसिध्दी होणेस विनंती आहे.